दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ४७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.११ मे २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात कोरोना रुग्णसंख्येत सर्वात मोठी घट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रातील करोना संसर्गाचा विळखा सैल होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. राज्यात आज दैनंदिन रुग्णसंख्येत मोठी घट झाली असून हा खूप मोठा दिलासा ठरला आहे. राज्यात गेल्या २४ तासांत ३७ हजार ३२६ नवीन रुग्णांची नोंद झाली असून गेल्या काही आठवड्यांतील ही सर्वात कमी रुग्णसंख्या ठरली आहे. विशेष म्हणजे ६१ हजार ६०७ इतक्या मोठ्या संख्येने रुग्ण आज करोनावर मात करून घरी परतले आहेत. त्यामुळे ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या कमी होऊन रिकव्हरी रेट ८७ टक्क्यांच्या जवळ पोहचला आहे. करोनाची पहिली लाट ओसरून काही काळ लोटत नाही तोच राज्यात करोनाची दुसरी लाट आक्राळविक्राळ रूप धारण करून धडकली. रुग्णसंख्येचे सगळे उच्चांक दुसऱ्या लाटेत मागे पडले. एकवेळ तर दैनंदिन रुग्णसंख्या ७० हजारांच्या जवळ पोहचली होती. यामुळे सर्वांनाच धडकी भरली होती. मात्र या स्थितीचा आरोग्य यंत्रणांनी नेटाने मुकाबला केला असून गेले काही दिवस वाढत्या रुग्णसंख्येला ब्रेक लावण्यातही यश आले आहे.

# आदिती तटकरे यांची कोविड नियंत्रण कक्ष आणि प्रस्तावित सिडको जम्बो कोविड सेंटरला भेट

### कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नियोजन आणि उपाययोजनांचा घेतला आढावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथील कोविड-१९ रुग्णांविषयी आणि रुग्णालयांविषयी सर्व माहिती संकलित करणाऱ्या वॉर रुमला भेट दिली. यावेळी त्यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजना आणि नियोजनाविषयी आढावा घेतला.

यावेळी महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, प्रांताधिकारी दत्तात्रेय नवले, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त संजय शिंदे, उपायुक्त सचिन पवार, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, तहसीलदार विजय तळेकर, पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे, माजी नगरसेवक शिवदास कांबळे, नियंत्रण कक्ष अधिकारी स्वप्नाली चौधरी, शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी बाबासाहेब चिमणे यांच्यासह महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री आदिती तटकरे यांनी पनवेल महानगरपालिकेचे २४ तास माहिती देणारे नियंत्रण कक्षाला भेट देऊन व्हेंटिलेटर बेड, ऑक्सिजन बेडची उपलब्धता, डॅशबोर्ड याविषयी डॉक्टरांकडून माहिती घेतली. तसेच बाधित रुग्णांच्या सर्व माहितीची यादी विषयी माहिती घेतली. त्याचप्रमाणे (डिस्चार्ज रुग्ण/मयत रुग्ण) नियंत्रण कक्ष अधिकारी स्वप्नाली चौधरी यांच्या टीमकडून कोरोनाबाधित रुग्णांच्या समन्वयाविषयी, यासह आयसीएमआर कडून मिळणाऱ्या पॉझिटिव्ह रुग्णांच्या



यादीतील माहिती डेटाबेस मध्ये सामाविष्ट करणे, मयत रुग्णांच्या अहवालाच्या नोंदी करणे तसेच हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या कोरोनाबाधित रुग्णांना हॉस्पिटलमधून ७ दिवसांनंतर दिला जाणाऱ्या डिस्चार्ज व गृह विलगीकरण असणारे रूग्ण याविषयी सविस्तर माहिती आदिती तटकरे यांनी घेतली.

नियंत्रण कक्षाद्वारे बेड उपलब्धतेसाठी रूग्णांलयांनी डॅश बोर्डवर माहिती अद्ययावत करण्यावरही या पथकाद्वारे लक्ष दिले जाते. सदरचे पथक २४ तास कार्यान्वित असून तीन वेगवेळी पथके सकाळी ०८ ते सायंकाळी ०४ , सायं ०४ ते रात्री १२ आणि रात्री १२ ते सकाळी ०८ अशा तीन पाळ्यांमध्ये कार्यान्वित आहे. या तीन पाळ्यांमध्ये तीन डॉक्टर्सही या पथकामध्ये कार्यरत आहेत. त्याचबरोबर कोरोनाची लागण झालेल्या रुग्णांना होमआयसोलेशनची गरज आहे का, डमिट करण्याची गरज आहे याविषयी नियंत्रण कक्षाद्वारे सल्ला देखील दिला जातो.

महापालिकेच्या आरोग्य विभागात कार्यरत असणाऱ्या ट्रेसिंग टीमद्वारे होम क्वारंटाईन असणाऱ्या रुग्णांना माहिती दिली जाते तसेच त्यांना औषधे, हाऊस सॅनिटायझिंग यासोबतच त्यांना बाहेर न फीरण्याचा सल्ला देखील दिला जातो. तसेच आयसीएमआर कडून आलेल्या लिस्टमधील पनवेलमधील पेशंटविषयी माहीती ट्रेस केली जाते. या सर्व विषयांची सविस्तर माहिती यादरम्यान आदिती तटकरे यांनी घेतली आणि त्याबाबत सूचनाही दिल्या.

याचबरोबर पालकमंत्री अदिती तटकरे यांनी कळंबोली येथील भारतीय कपास निगमच्या गोडाऊनमध्ये होणाऱ्या प्रस्तावित जंबो कोविड सेंटरची पहाणी केली. तेथे सुरु असलेल्या कामकाजाची माहिती घेऊन सिडकोला लवकरात लवकर काम पुर्ण करुन महापालिकेला रुग्णालय ताब्यात द्यावे अशा सुचना यावेळी त्यांनी दिल्या. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापक कैलास शिंदे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

## उद्धव ठाकरे मुख्यमंत्री आहेत म्हणूनच 'हे' शक्य झालं : इक्बालसिंह चहल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना संसर्गाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेतही मोठा उद्रेक पाहणाऱ्या मुंबईत तितक्याच वेगाने स्थिती नियंत्रणात आणण्यात यंत्रणा यशस्वी ठरल्या आहेत. मुंबईच्या या लढाऊ बाण्याचं सध्या देशभरात कौतुक होत आहे. त्यात या लढाईचे नेतृत्व करणारे मुंबई महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी जे मॉडेल तयार केले आहे त्याला सारं श्रेय देण्यात येत आहे. अशावेळी खुद्द चहल यांनी या लढ्याला बळ मिळण्यामागचं खरं कारण एका मुलाखतीत सांगितलं आहे.



महापालिका आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीची मुक्तकंठाने प्रशंसा करत मुंबईतील करोना विरोधी लढ्याला बळ मिळण्यामागचं प्रमुख कारण मुख्यमंत्री ठाकरे असल्याचंच एकप्रकारे अधोरेखित केलं आहे. संकटाच्या काळात तातडीने निर्णय घेणे आणि ते अमलात आणणे गरजेचे असते. अर्थात त्यासाठी तुम्हाला तितकी मोकळीकही मिळणे आवश्यक असते. याबाबतीत मी नशीबवान ठरलो. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मला निर्णय घेण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिलं आणि त्यामुळेच अनेक गोष्टी करणं मला शक्य झालं, अशा शब्दांत चहल यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

मुंबईत पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत रुग्णवाढीचा उद्रेक होऊनही स्थिती हाताबाहेर का गेली नाही, याचा फोडही चहल यांनी केला. करोनाने उच्चांक गाठला असताना गेल्या मे महिन्यात मी पालिका आयुक्त म्हणून सूत्रे स्वीकारली. त्यानंतर पालिकेची संपूर्ण टीम आणि संबंधितांना मी विश्वासात घेतलं. करोना संसर्ग हा काही लगेच जाणारा नाही. ही एक दीर्घ लढाई आहे. कदाचित दोन-तीन वर्षेही यात जातील. त्यामुळे त्यादृष्टीने आपले नियोजन असायला हवे, अशी स्पष्ट सूचना मी दिली. त्यानुसार पुढे नियोजनही केले गेले आणि आज दैनंदिन रुग्णसंख्या १० हजारांवर गेली तरीही यंत्रणेवर ताण येत नाही. स्थिती सुरळीतपणे हातळली जात असल्याचे आपल्याला दिसत आहे. एकप्रकारे ऑटोपायलट मोडवर काम सुरू असून काही अडचण आली म्हणून मला कोणाचा फोनही येत नाही, असे नमूद करत मुंबई मॉडेलच्या यशामागचं गुपित चहल यांनी उलगडवलं. यावेळी ऑक्सिजन तुटवड्यावर कशी मात केली हेसुद्धा चहल यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### गंभीर आजारावर मिळणार मोफत उपचार : आरोग्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

जालना : राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये करोना रुग्ण म्युकरमायकोसीस या बुरशीजन्य आजाराने ग्रस्त असून त्याची गंभीर दखल आरोग्य विभागाने घेतली आहे. या आजाराच्या जाणीव-जागृतीसाठी मोहीम हाती घेण्यात यणार असून म्युकरमायकोसीसच्या रुग्णांवर महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून मोफत उपचार करण्यात येतील, अशी माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे. जालना येथे माध्यम प्रतिनिधींनीशी संवाद साधताना आरोग्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. यासंदर्भात माहिती देतांना राजेश टोपे यांनी सांगितले की, ज्या करोना रुग्णांना मधुमेह आहे आणि त्यांचा मधुमेह नियंत्रित नाही त्यांच्यामध्ये म्युकरमायकोसीस या बुरशीजन्य आजाराचे लक्षण आढळून येत आहे. नाकाजवळ, ओठाजवळ काळसर ठिपका या आजारात आढळून येत असल्याचे राजेश टोपे यांनी सांगितलं आहे. या आजारावर लवकर उपचार नाही केले तर श्वसन, मेंदू, डोळ्यांवर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत असल्याचे सांगतानाच या आजाराचे लवकर निदान होणं गरजेचं असल्याने त्याबाबत नागरिकांमध्ये जाणीवजागृती करण्यात येणार आहे, असं आरोग्यमंत्र्यांनी सांगितलं आहे. या आजावरील औषध महागडे असून त्यामुळे महात्मा फुले जनआरोग्य योजनेत सहभागी असलेल्या १००० रुग्णालयांमध्ये या आजाराच्या रुग्णांवर मोफत उपचार केले जातील, असंही राजेश टोपे यांनी म्हटलं आहे.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

## कोव्हीड-१९ च्या उपाययोजनेसाठी १७६ कोटी २९ लाख रुपये निधी वितरित : विजय वडेट्टीवार

### विभागीय आयुक्त कोकणसाठी १६१३.८४ लाख रुपये

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी विभागीय आयुक्तांना १७६ कोटी २९ लाख पाच हजार रुपये निधी वितरित करण्यात आला असल्याची माहिती मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली.



श्री. वडेट्टीवार म्हणाले, कोविड-१९ प्रादुर्भाव रोखण्यासाठी विभागीय आयुक्त कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची मानके व बाबीनुसार केलेला खर्च भागविण्यासाठी या कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबीविचारात घेऊन राज्य कार्यकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून रु. १७६,२९ ,०५,०००/- (रुपये एकशे शहात्तर कोटी एकोणतीस लाख पाच हजार) इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

यामध्ये विभागीय आयुक्त कोकणसाठी १६१३.८४ लाख रुपये, विभागीय आयुक्त पुणेसाठी २८१० .७९ लाख रूपये, विभागीय आयुक्त ..../२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून महापौर सहाय्यता निधीस २५ लाखाची मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून गोर गरीब गरजूंना सढळ मदत सातत्याने होत असते. त्याचबरोबर प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत त्यांनी लोकांना मदतीचा हात देत आधार दिला आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महापौर सहाय्यता निधीसाठी २५ लाख रुपयांची मदत केली आहे.

सदरचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्याकडे आज (सोमवार, दि. १० मे) सुपूर्द केला. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सभागृहनेते परेश ठाकूर उपस्थित होते.

महापूर असो वा कोरोना महामारी किंवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वसामान्यांचा विचार करून नेहमीच सर्वोतपरी मदत केली आणि ती मदतीची परंपरा आजही कायम आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना वैद्यकीय कारणांसाठी तसेच अपघात किंवा नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी लोकसहभागातून महापौर सहाय्यता निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीमधून आर्थिकदृष्ट्या दुर्बल गरजूंना कोविड-१९, हृदयरोग, मेंदू संबंधित उपचार तसेच शस्त्रक्रिया, कॅन्सर संबंधित शस्त्रक्रिया, ल्युकेमिया, थॅलेसीमिया, क्षयरोग, अवयव



> आपत्कालीन परिस्थितीत गोरगरिबांना अडचण येऊ नये यासाठी महापौर सहाय्यता निधी उपयोगी ठरणार आहे. त्या अनुषंगाने आपतग्रस्तांना मदत होण्याकरिता आपलाही खारीचा वाटा असावा यासाठी निधी दिला आहे.
>
> **- लोकनेते रामशेठ ठाकूर**

प्रत्यारोपण, डायलिसिस, बोनमॅरो यांसारख्या गंभीर आजारांसाठी आर्थिक मदत करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्तांना, अपघातामुळे मृत्यू किंवा कायमस्वरूपी दुखापत, कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्यांना आर्थिक मदत करण्यात येणार आहे. महापौर सहाय्यता निधीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २५ लाख रुपयांची मदत करून दुर्बल घटकातील गरजूंना दिलासा देत सामाजिक बांधिलकी कायम जपली आहे.

> गेल्या वर्षी महापौर सहाय्यता निधी ट्रस्टची स्थापना करण्यात आली. सर्वप्रथम सभागृहनेते परेश ठाकूर व भाजप आरपीआयच्या नगरसेवकांनी यामध्ये मदतीचा निधी दिला. लोकसहभागातून जमा झालेला निधी नैसर्गिक आपत्ती, वैद्यकीय मदतीसाठी उपयुक्त आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी २५ लाख रुपये महापौर सहाय्यता निधीला देऊन या ट्रस्टला मदत केली, त्याबद्दल मी महानगरपालिकेच्या वतीने त्यांचे आभार मानते.
>
> **- डॉ. कविता चौतमोल, महापौर, पनवेल महानगरपालिका**

## दैनिक रायगड नगरीचा दणका ; विद्युत वितरण कंपनीकडून धनादेशासाठी बॉक्स कार्यान्वित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर विद्युत वितरण कंपनीची बिले भरण्यासाठी लांबचलांब रांगा लागत होत्या. त्यामुळे न कळत कोरोनाला आमंत्रण होते. विद्युत वितरण कंपनीची माहे एप्रिलची बिले वाढत्या कोरोना मुळे पतसंस्थांनी आणि बँकांनी घेण्याची केंद्रे बंद केली होती. त्यामुळे कोरोना काळात ग्राहकांना बिले भरण्यासाठी एकच आधार होता तो विद्युत वितरण कंपनीचे कार्यालय!

परंतु तेथे मोठमोठ्या रांगा लागल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसह महिला यांना त्रास होऊ लागला. तासनतास या रांगेत उभे राहिल्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू शकतो हे लक्षात आल्यामुळे व नागरिकांनी केलेल्या मागणीमुळे दैनिक रायगड नगरीने आपले लेखणीचे हत्यार उपसून विद्युत वितरण कंपनीच्या बेजबाबदार असलेल्या नानोटे यांना आवरण्यासाठी आपल्या दैनिक रायगड नगरीच्या दि.९ मे रोजीच्या अंकात ''नानोटे यांच्या असहकारामुळे पनवेल शहरातील विद्युत ग्राहकांमध्ये असंतोष'' या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित होताच त्या वृत्ताची दखल घेऊन विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता राठोड यांनी तात्काळ पनवेल विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नानोटे यांना आदेश देऊन कार्यालयामध्ये बिलाचे धनादेश घेण्यासाठी एक बॉक्स बसविला.

त्यामुळे ग्राहकांची गर्दी कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळाला. त्यामुळे पनवेल शहरातील विद्युत ग्राहक दैनिक रायगड नगरीला धन्यवाद देत आहे.

## पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील त्रुटी तात्काळ दूर करा: खा. श्रीरंग बारणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उपजिल्हा रुग्णालयात २०० बेड असून सर्व सोयी सुविधा असलेले हॉस्पिटल आहे. कोरोना रुग्णांसह इतर रुग्णावर देखील उपचार केले जातात. अनेक कोरोना रुग्ण येथे उपचार घेऊन ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत. रुग्णालयात मनुष्यबळ वाढवावे. डॉक्टर, औषधे उपलब्ध करून देण्याच्या सूचना शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच रुग्णालयातील त्रुटी तत्काळ दूर करण्याचा सूचनाही त्यांनी रुग्णालय प्रशासनाला दिल्या.

पनवेल उपजिल्हा रूग्णालयाला खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (सोमवारी) भेट दिली. रुग्णांची विचारपूस केली. रूग्णालयातील कोरोना वार्ड व इतर पेशंटची सविस्तर माहिती घेतली. वैद्यकीय अधिक्षक डॉ. बसवराज लोहारे, डॉ. बालाजी फाळके, डॉ. अरुण पोहरे,



सुभाष जाधव, ज्योती गुरव, शिवसेना जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, पनवेल शहर संघटक प्रविण जाधव,कामोठे शहर प्रमुख राकेश गोवारी,जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यावेळी उपस्थित होते. पनवेल उपजिल्हा रुग्णालयात २०० बेड आहेत. सर्व सोयी सुविधा असलेले हॉस्पिटल आहे. कोरोना रुग्णांसह इतर रुग्णावर देखील उपचार केले जातात. व्हेंटिलेटर, आयसीयू, ऑक्सिजनची कमतरता भासू देऊ नका, रूग्णांना चांगली सेवा द्यावी. जिल्ह्यातील चांगल्या प्रकारचे रुग्णालय आहे. अनेक रुग्ण येथे उपचार घेऊन ठणठणीत बरे होऊन घरी गेले असल्याचे सांगून खासदार बारणे म्हणाले, सद्यस्थितीत उपचार घेत असलेल्या रुग्णांची माहिती घेतली. ज्या त्रुटी आहेत. त्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. त्या तत्काळ सोडवण्याच्या सूचना दिल्या आहेत. ..../२

# माध्यम स्वातंत्र्याचे वारे

जगात कोणत्याही सत्ताधाऱ्यांना माध्यमांचे मुक्त स्वातंत्र्य मनापासून रुचत नसते. माध्यमे टीका करायला लागली, की सगळे सत्ताधारी मनातून अस्वस्थ होतात. यावरचे मार्ग ठरलेले असतात. अंकित करा, कायद्यांच्या बेड्या घाला, दडपण आणा किंवा शेवटी त्यांच्या अस्तित्वावर घाला आणा. इंदिरा गांधी यांनी आणलेल्या आणीबाणीत माध्यमांची कशी गळचेपी झाली, हा इतिहास अजून देशाच्या स्मृतिपटलावरून पुसला गेलेला नाही. माध्यमे हे आपल्या देशहिताच्या धोरणांतले अडसर आहेत आणि त्यामुळे, त्यांना वेसण घालणे हे देशहिताचे आहे, असा अनेक राज्यकर्त्यांचा प्रामाणिक पण बालिश समज असतो. मात्र, निवडणूक आयोगासारखी घटनादत्त अधिकार असणारी संस्था असे वागू लागली तर ती धोक्याची घंटा समजावी. काही दिवसांपूर्वी पाच प्रदेशांमध्ये विधानसभांच्या निवडणुका झाल्या. त्यावेळी, करोना निर्बंधांची जी ऐशी की तैशी झाली, तिच्या अनुषंगाने एका उमेदवाराने मद्रास उच्च न्यायालयात याचिका केली होती. तिची सुनावणी करताना न्यायमूर्तींचा तोल किंचित सुटला आणि त्यांनी आयोगावर अत्यंत कठोर ताशेरे झाडले. ते ताशेरे भारतीय दंडविधानाच्या कलमांमध्ये बसणारे नसतील कदाचित; पण लोकभावना मुखर करणारे होते. निवडणूक आयोगाने या ताशेऱ्यांची भाषा न पाहता भावना पाहायला हवी होती. मात्र, सुनावणी चालू असताना नोंदविली जाणारी मौखिक निरीक्षणे माध्यमांनी प्रसारितच करू नयेत, अशी मागणी निवडणूक आयोगाने केली आणि सर्वोच्च न्यायालयाने तसे आदेश द्यावेत, असे म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने ज्या तडफेने आणि निखालस शब्दांमध्ये आयोगाची ही याचिका फेटाळली, तिचे स्वागत करायला हवे. कोणत्याही निमित्तांनी आणि मिषांनी माध्यमांना अंकुश टोचण्यात सरकारी यंत्रणांना मोठे भूषण वाटते. मात्र, न्या. धनंजय चंद्रचूड आणि न्या. एम. आर. शहा यांनी नागरिकांच्या माहितीच्या मूलभूत अधिकारांना संरक्षण देण्याची भूमिका घेतली. न्यायालयांचा निकाल काहीही लागणार असला तरी प्रत्यक्ष सुनावणी चालू असताना काय कामकाज झाले, हे जाणून घेण्याचा अधिकार नागरिकांना आहेच आणि त्या अधिकारांवर गदा आणता येणार नाही, असे खंडपीठाने स्पष्ट म्हटले आहे. मद्रास उच्च न्यायालयाला भाषेच्या दर्जाबद्दल चार शब्द सुनावल्यानंतर न्यायमूर्तींनी असे म्हटले की, न्यायालयांचा अंतिम निर्णय हीच न्यायपालिकेची भूमिका असते. ती सर्वांसमोर येतेच. असे असताना सुनावणीत काय झाले, हे लपविण्याचे कारण नाही. सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल मुळीच अनपेक्षित नाही. यातली खरी गोम निवडणूक आयोगाला अशी याचिका करण्याचे धाडस व्हावे, यात आहे. निवडणूक आयोगाने या पाचही निवडणुकांमध्ये केंद्र सरकारच्या ताटाखालचे मांजर असल्यासारखे वर्तन केले आहे. त्याची फळे आज करोनाच्या भयंकर प्रादुर्भावामुळे त्या त्या राज्यांमध्ये भोगावी लागत आहेत. असे असताना माध्यमांनी सरकार तसेच निवडणूक आयोगाला धारेवर धरणे स्वाभाविक आहे. 'तुमच्या घटनादत्त अधिकारांचा संकोच करून सरकारचे मिंधे व्हाल तर एका स्वतंत्र व स्वायत्त संस्थेच्या स्वातंत्र्याला नख लावाल,' असे आयोगाला खडसावण्यात काहीच चूक नाही. किंबहुना, ते अत्यंत गरजेचे होते. नेमके तेच काम देशभरातील माध्यमांनी केले. याचा राग निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात याचिका करून काढला. हा रडीचा आणि लोकशाहीशी द्रोह करणारा डाव झाला. विविध संस्था आणि यंत्रणा हे जे असे वर्तन करतात, त्यांचेच प्रतिबिंब जगभरातील अनेक पाहण्यांमधून पडते. 'रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्स' ही संस्था दरवर्षी जगातील माध्यम स्वातंत्र्याचे मापन करीत असते. यंदा १८० देशांमधील माध्यमांचे स्वातंत्र्य जोखण्यात आले आणि त्यांचा क्रम लावण्यात आला. यंदा भारताचा क्रम १४२ वा लागला. इ. स. २०१६ मध्ये असणारे १३३वे स्थान घसरत गेल्या वर्षी १४२वर थांबले. यंदा ते वर किंवा खाली न जाता भारताने आपले स्थान टिकवले. नशीब इतकेच की, चीन, उत्तर कोरिया आणि तुर्कमेनिस्तान असे लोकशाहीचा सूर्यच न पाहणारे देश भारताच्या अजूनतरी खाली आहेत. सात दशके संसदीय लोकशाही नांदत असताना भारताचे स्थान माध्यम स्वातंत्र्यात खरेतर पहिल्या दहांमध्ये हवे. मात्र, दडपशाही करणारी सरकारे, पत्रकारांना निष्पक्ष काम करू न देणारे प्रशासन आणि इतर बऱ्याच घटकांमुळे भारत आफ्रिका व आशिया खंडातील लोकशाही नसणाऱ्या देशांच्या पंगतीत बसला आहे. परकीय संस्थांच्या पाहणीवर आपण विश्वास का ठेवायचा आणि माध्यमांनी जबाबदारीने वर्तन करू नये का, हे दोन प्रश्न यावर विचारले जातील. ते योग्य आहेत. मात्र, आपण नेमके किती स्वतंत्र व मोकळे आहोत, याचे 'सहावे संज्ञापन' माध्यमांना अचूक होत असते. या मुक्त माध्यम स्वातंत्र्याचे वारे सत्ताधीशांना आवडत नाहीत, याचा सुगावा लागला की लाचार सत्तांकित पुढे सरसावतात आणि मग माध्यमांचे पतमापनही घसरू लागते. तसे सध्या होते आहे.

# माथेरानला जीवन प्राधिकरणाचा सावळागोंधळ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये सध्या पर्यटन बंद असून ही स्थानिकांना तीव्र पाणीटंचाईस सामोरे जावे लागत असून मागील एकवर्षापासून हे रडगाणे सुरूच असल्याने जलप्राधिकारणाचा ढिसाळ कारभार ह्यामुळे समोर येत आहे

चार दिवसांपूर्वीच माथेरानच्या नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी जलप्राधिकारण अधिकाऱ्यांशी चर्चा करून माथेरानचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा ह्या संदर्भात सविस्तर चर्चा केली होती व अनेक त्रुटी अधिकाऱ्यांच्या नजरेस आणून दिल्या होत्या व त्यावेळी माथेरानचा पाणीपुरवठा नियमित होईल अशी ग्वाही ह्यावेळी अधिकाऱ्यांनी दिली होती पण दुसऱ्याच दिवशी जलप्राधिकरणाच्या ढिसाळ कारभाराचा फटका येथील काही प्रभागांना बसला होता काही ठीकानी दिवसभर पाणी च दिले गेले नाही व दुसऱ्या दिवशी गढुल पाण्याचा पुरवठा केला गेला अनेकवेळा जलप्राधिकरण अधिकाऱ्यांशी चर्चा करून ही माथेरानच्या पाण्याची स्थिती जैसे थे असल्याने नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे.

माथेरान मध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या बदलण्याचे काम ठेकेदारद्वारे पूर्ण केले गेले आहे पण हे काम करताना त्याकडे लक्ष न दिले गेल्यामुळे घाईगडबडीत उरकण्यात आले आहे त्याचा फटका आता येथील नागरिकांना बसत आहे अनेक ठिकाणी जलवाहिन्या फुटण्यास सुरवात झाली असून अनेक ठिकाणी जलवाहिन्यामध्ये कचरा जमा होत आहे माथेरान बाजारपेठेत अशीच जलवाहिनी फुटल्यावर पाहिले असता त्यात चक्क एक चप्पल व पाण्याची रिकामी बाटली आढळून आल्याने ह्या ठेकेदारांच्या कामावर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे व ह्या ठेकेदाराने अनेक ठिकाणी अशीच ढिसाळ कामे करून ही त्याला अधिकारी वर्गाकडून पाठीशी घालण्याचे काम सुरू असल्याने दिसून येत आहे.

माथेरांमधील स्थानिक कर्मचारी आपल्या परीने नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा देण्याचा प्रयत्न करीत आहेत पण नेरळ माथेरान जलवाहिनी वरील ठेकेदार पाणी पुरवठ्या कडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याने नेरळ हुन माथेरांकडे होणारा पाणीपुरवठा वारंवार खंडित होत आहे व ह्या जलवाहिनीवर अनधिकृत जोडण्या असलेल्यानं मात्र चोवीस तास अखंड पाणी पुरवठा होत आहे व त्याचा थेट फटका माथेरांकरांच्या पाणी पुरवठ्यावर होत आहे.



# युडीपीसीआरनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरणाऱ्या बांधकामांना अंतरिम ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा सिडकोचा निर्णय

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

राज्य शासनाच्या एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली २०२० (युडीपीसीआर २०२०) नुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याकरिता नवी मुंबई क्षेत्रातील बांधकामांसाठी अंतरिम ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सिडको महामंडळाने घेतला आहे. यामुळे संबंधित भाडेपट्टाधारकांना अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासह स्थानिक प्राधिकरणांकडून बांधकाम परवाना मिळवणे शक्य होणार आहे.




राज्य शासनाने नुकतीच अंमलात आणलेली एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली २०२० ही बृहन्मुंबई महानगरपालिका अधिकारक्षेत्र वगळता संपूर्ण महाराष्ट्राकरिता लागू आहे. नवी मुंबई क्षेत्रातील सर्व जमिन सिडकोच्या मालकीची असून सदर भूखंड भाडेपट्ट्याने दिले आहेत. यामुळे सदर नियमावली अंतर्गत बांधकामासाठी अतरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा वापर करू इच्छिणाऱ्या भाडेपट्टाधारकांना स्थानिक प्राधिकरणांकडून जसे, नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका व उलवे, द्रोणागिरी इ. नोडकरिता सिडको, बांधकाम परवानगी मिळवण्याकरिता सिडकोकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. याकरिता अनेक भाडेपट्टाधारक सिडकोशी संपर्क साधत आहेत.

नवी मुंबई भूमी विनियोग (सुधारित) अधिनियम २००८ अंतर्गत अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्य आकारून वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याचा आणि जमिनीच्या वापर बदलास परवानगी देण्याचा अधिकार पट्टाकार म्हणून सिडकोला आहे. परंतु एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमध्ये वाढीव चटई क्षेत्र मंजूर करण्याकरिता सिडकोने किती प्रमणात अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्य आकारावे याबाबत कोणतेही निर्देश नमूद नाहीत. याकरिता एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली अंतर्गत वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याकरिता किती प्रमाणात अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्य आकारण्यात यावे, हे निश्चित करण्याकरिता सिडको धोरण तयार करत आहे. परंतु कोविड-१९ महासाथीमुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे मंदीने ग्रासलेल्या बांधकाम क्षेत्राला चालना देणे आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन एकात्मिक विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक किंवा वापर बदल मंजूर करण्याकरिता, अनुज्ञप्ती/भाडेपट्टाधारकांकडून हमी घेऊन आणि अंशत: शुल्क घेऊन त्यांना अंतरिम ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्याबाबतचे धोरण निश्चित होईपर्यंत ही तात्पुरती व्यवस्था असणार आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र - सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त केलेले परंतु बांधकाम पूर्ण न झाल्याने अनुक्रमे सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न करू शकलेले भाडेपट्टाधारक, सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या परंतु अंशत: बांधकाम केल्याने अनुक्रमे सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या व पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र न मिळालेले भाडेपट्टाधारक, सिडकोबरोबर भाडेपट्टा करार करून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राकरिता अर्ज केलेले परंतु अद्याप बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र प्राप्त न झालेले सर्व भाडेपट्टाधारक, सिडकोबरोबर भाडेपट्टा करार केलेले परंतु अद्याप बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राकरिता अर्ज न केलेले सर्व भाडेपट्टाधारक, सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेले परंतु निष्पादित किंवा नोंदणीकृत न झालेला सहकारी संस्था/अपार्टमेन्टचे कंडोमिनियम/प्रायव्हेट लि. कंपनी च्या बाजूने असणारा भाडेपट्टा विलेख असणारे भाडेपट्टाधारक, सिडको/नवी मुंबई मनपा/पनवेल मनपाकडून पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केलेले आणि सहकारी संस्था/अपार्टमेन्टचे कंडोमिनियम/प्रायव्हेट लि. कंपनी च्या बाजूने असणारा निष्पादित झालेला भाडेपट्टा विलेख असणारे भाडेपट्टाधारक - या प्रवर्गांना देण्यात येईल.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र हे जेथे बांधकामास अद्याप सुरुवात झाली नाही अशा बांधकामांसाठी, बांधकाम परवाना प्राप्त करण्याकरिता देण्यात येणार आहे. बांधकाम सुरू असलेल्या आणि जोते प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या प्रकरणांमध्ये अनुज्ञप्ती/भाडेपट्टाधारकांनी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकाकरिता स्थानिक प्राधिकरणाकडून सुधारित बांधकाम परवाना प्राप्त केल्यावर, सुधारित भाडेपट्टा कराराकरिता सिडकोशी संपर्क साधावा. सदर ना-हरकत प्रमाणपत्र देताना सर्व भूखंडांच्या वार्षिक मूल्य दराच्या १०% शुल्क आणि सामाजिक सुविधा भूखंडांच्या बाबतीत वार्षिक मूल्य दराच्या ५% शुल्क हे सुरक्षा ठेव म्हणून आकारण्यात येईल. सदर शुल्क हे अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्य धोरण निश्चित झाल्यानंतर आकारण्यात येणाऱ्या अतिरिक्त भाडेपट्टा अधिमूल्यामध्ये समायोजित करण्यात येईल. तसेच सुधारित करारनामा करतेवेळी उर्वरित शुल्क आणि जीएसटी भरण्याची हमी अनुज्ञप्तीधारक/भाडेपट्टाधारकाकडून घेण्यात येईल. सिडकोचा हा निर्णय भाडेपट्टाधारकांना व एकंदर बांधकाम क्षेत्राला दिलासा देणारा ठरणार आहे.

> युडीपीसीआरनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वापरणाऱ्या बांधकामांसाठी अंतरिम ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याने स्थानिक प्राधिकरणांकडून बांधकाम परवाना प्राप्त करून भाडेपट्टाधारकांना लगेच बांधकामांना सुरुवात करणे शक्य होणार आहे. सिडकोचा हा निर्णय शहरातील बांधकाम क्षेत्राला निश्चितच चालना देणारा ठरणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द केले ५० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी रायगड जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्याप्रसंगी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्याकडे ५० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर सुपूर्द केले.

यावेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, तहसिलदार सतीश कदम, स्वदेश फाउंडेशन चे तुषार इनामदार हे उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, सध्याच्या परिस्थितीत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या पुढाकारातून व त्यांच्या सूचनेनुसार रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी प्रत्येकी ५० असे एकूण १५० ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यात येत आहेत. त्यापैकी रायगड जिल्ह्यातील अलिबाग करिता २० तर महाड, कर्जत व खालापूर या तालुक्यांकरिता प्रत्येकी दहा ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर देण्यात येत आहेत.

याप्रसंगी स्वदेश फाउंडेशनच्या वतीने उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या शुभहस्ते जिल्हा प्रशासनाकडे ५० हजार मास्क व ५ मोबाईल व्हेंटिलेटरही सुपूर्द करण्यात आले. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यावेळी स्वदेश फाउंडेशन च्या सामाजिक कार्याची स्तुती करीत इतर स्वयंसेवी संस्थांनीही पुढे येऊन शासन- प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन केले. सध्या रायगड जिल्हा ऑक्सिजन पुरविणारा जिल्हा म्हणून ओळखला जातोय, याबाबत येथील लोकप्रतिनिधींचे व जिल्हा प्रशासनाचे विशेष अभिनंदन करून या जिल्ह्यासाठी येणाऱ्या काळात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री या नात्याने येथील सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र घेऊन, परस्पर सामंजस्याने शैक्षणिक क्षेत्रात भरीव काम करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संकुल उभारण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, शासकीय इंजीनियरिंग कॉलेज, आयसीटी (इन्फोर्मेशन न्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी), शासकीय विधी महाविद्यालय यांच्या शाखाही सुरू करण्याचाही प्रयत्न करणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यावेळी सांगितले.

लसीकरणाबाबत माहिती देताना ते म्हणाले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी कॉलेज क्लस्टर ही संकल्पना राबवून गर्दी न होता अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने लसीकरण कार्यक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री स्व.बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांच्या प्रयत्नांनी उभारण्यात आलेल्या लोणेरे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात करोना परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण महामहीम राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री कु.आदिती तटकरे तसेच जिल्ह्यातील इतर सर्व लोकप्रतिनिधींच्या विशेष उपस्थितीत केले जाईल, असे सांगून त्यांनी घोषित केले की, या विद्यापीठाचा होणारा इ-ढण असा नामोल्लेख आजपासून कायमचा बंद करण्यात येत असून सर्वांनी या विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ असा पूर्ण नामोल्लेखच करावा.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## १७६ कोटी २९ लाख रुपये निधी वितरित : विजय वडेट्टीवार

नाशिक साठी ४१९९.३१ लाख रूपये, विभागीय आयुक्त औरंगाबाद साठी ६१५४. ९३ लाख रूपये, विभागीय आयुक्त अमरावती साठी २०९१. १० लाख रूपये आणि विभागीय आयुक्त नागपूर साठी ७५९. ०८ लाख रुपये वितरीत करण्यात आले आहेत. हा निधी कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी वितरित करण्यात आला आहे.

## पनवेल उपजिल्हा रुग्णालयातील त्रुटी दूर करा


डॉक्टर, नर्स, सर्व स्टाफ उत्तम काम करत आहे. कर्मचाऱ्यांवर ताण येत आहे. मनुष्यबळाची कमतरता आहे. याबाबत तत्काळ संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना फोन करून डॉक्टर, औषधे उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या असून लवकरच अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध होईल. त्यामुळे कोरोना विरोधातील लढाईला आणखी बळ मिळेल असेही त्यांनी सांगितले.

कोरोना महामारीत खासदार श्रीरंग बारणे मतदारसंघातील सर्व कोविड रुग्णालयाला प्रत्यक्षपणे भेट देतात. माहिती जाणून घेऊन, त्रुटी दूर करण्याच्या सूचना प्रशासनाला देतात. रुग्णांशी संवाद साधतात, त्यांच्या समस्या जाणून घेतात. रुग्णांना धीर देतात. पिंपरी-चिंचवड, मावळ, पनवेल, उरण, खालापूर, कर्जत येथील कोरोना परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतात. या महामारीत नागरिकांना कोणताही त्रास होता कामा नये, अशा सूचना प्रशासनाला देतात. कोरोना रुग्णांची पिळवणूक केली जात असेल. तर, स्वतः तिथे जाऊन संबंधितांना जाब विचारतात. त्यामुळे रुग्णांना दिलासा मिळत आहे. अक्षरशः पायाला भिंगरी लावून खासदार मतदारसंघात फिरत आहेत. त्यामुळे त्यांच्या कामाचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

# विमानतळाला दि.बां.चेच' नाव हवे ; महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला होता ठराव

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी विरोधी पक्षनेते, माजी खासदार, भूमिपुत्रांची अस्मीता असलेले प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे, हि भूमिका पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. या संदर्भात यापूर्वीच पनवेल महानगरपालिकेच्या जुलै २०१८ च्या सर्वसाधारण सभेत नवी मुंबई विमानतळाला लोकनेते स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठरावही सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे.



पनवेलकर जनतेच्या तसेच पनवेल परिसराच्या जडण घडणीमध्ये लोकनेते दि. बा. पाटील यांनी मोलाचे योगदान दिले आणि पनवेलला विशेष नावलौकिक प्राप्त करून दिला. त्यांनी पनवेलच्या विकासाकरिता व नियोजनाकरिता अत्यंत भरीव असे योगदान दिले आहे. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव पनवेल महानगरपालिकेच्या १३ जुलै २०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत तत्कालीन उपमहापौर चारुशिला घरत यांनी सभागृहात मांडला होता. हा ठराव घेण्यासंदर्भात सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेविका सुशिला घरत, दर्शना भोईर, कुसुम म्हात्रे, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, अमर पाटील यांनी प्रस्ताव सूचना केली होती. त्यानुसार सभागृहात सर्वानुमते हा ठराव मंजूर करण्यात आला होता. मुंबई शहराला पर्याय म्हणून नवी मुंबई शहराची निर्मिती केली गेली. याकरिता हजारो शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली. मात्र शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोलाने घेणाऱ्या सिडकोविरोधात दि. बा. पाटील यांनी यशस्वी लढा दिला. त्याचबरोबर देशाला साडेबारा टक्क्याचा नवा कायदा दिला. तसेच स्थानिकांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा अधिकार दिल्याने अशा नेत्याच्या त्यागाची दखल घेण्यासाठी विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव करण्यात आला. नवी मुंबई विमानतळाला शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा प्रस्ताव नुकताच सिडको अस्थापनाच्या वतीने पारित करून तो राज्य शासनाकडे पाठविला. ही बातमी प्रसिद्ध होताच नवी मुंबई विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र रोष उमटला आहे. दिबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी आग्रही भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर कामोठे ग्रामस्थ मंडळाच्यावतीने पत्रकार परिषद आयोजित करून त्यात विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे अशी मागणी मांडण्यात आली. वेळ पडल्यास पराकोटीचा संघर्ष करत वाट्टेल ते मोल देण्याची तयारी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे 'दिबांसाठी' काहीही पण करण्याची भूमिका प्रकल्पग्रस्त स्थानिकांनी घेतली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून दोघेजण स्कुटीवरुन पसार झाल्याची घटना शहरात घडली आहे. अश्विनी धुमाळ (५०) या पनवेल प्लाझा सी.एच.एस. इमारतीसमोरुन नवीन पनवेल ब्रीजच्या लगत जात असताना स्कुटीवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील जवळपास ४५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मणी मंगळसूत्र जबरीने खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## म्हसळा तालुक्यातील मौजे पांगळोली येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्हसळा तालुक्यातील मौजे पांगळोली येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे पांगळोली ता.म्हसळा येथील स.नं./हि.नं.१८/१,क्षेत्र ०.१७.० हे.आर. मिळकतीपैकी ०-०५-० हे.आर. इतके क्षेत्र, ग्रामपंचायत पांगळोली यांच्याकडील ही जमीन ग्रुप ग्रामपंचायत संदेरी, ता.म्हसळा यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करण्यात आली असून ही जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन आरोग्य उपकेंद्र पांगळोली, ता.म्हसळा करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## ६ वी साठी होणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालय निवड परीक्षेच्या तारखेत बदल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जवाहर नवोदय, विद्यालय, माणगाव येथील इयत्ता ६ वी प्रवेशासाठी निवड चाचणी दि.१६ मे २०२१ रोजी घेण्यात येणार होती. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे ही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे निजामपूर, ता.माणगाव येथील जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.व्ही.बोभाटे यांनी कळविले आहे. निवड चाचणीची सुधारित तारीख नंतर कळविण्यात येईल.

# पालकमंत्री लसीकरणातील गोंधळ थांबवा अन्यथा लसीकरण वाया जाईल अशी भिती

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**





कोव्हॅक्सिन लसिकरण चा पहिला डोस दिला आणि आता दूसरा डोस देण्यासाठी उपलब्ध नाही. अस म्हणतात व कोव्हॅक्सिनचा साठा असुनही तो फक्त १८ ते ४४ वयोगटातील नागरिकांचे लसिकरणासाठी आला आहे असे सांगण्यात येत आहे. हे अजब प्रकार सध्या माणगांव लसिकरण मोहिम विषयी सुरु असुन लोक अत्यंत घाबरले असुन संभ्रमावस्थेत आहेत. दूसरे डोसची शासनानेच तारीख दिली असुन कोव्हॅक्सिन लस घेतल्या नंतर अठ्ठावीस दिवसाने वा जास्तीत जास्त एक आठवडा उशिरा पर्यंत परत घ्यायची असते, असे तज्ञांचे म्हणने आहे. मग आता काही नागरिकांचे दूसरे डोसची तारीख उलटून जवळपास पंधरा दिवस उलटले आहेत. मग आधी केलेले लसिकरण वाया गेले का ? असा सवाल विचारला जात आहे.

आता पुन्हा तोच बेचा पाढा परत नोंदणी परत लसिकरण परत करावे लागणार का ? अशी इकडे आड तिकडे विहिर, अवस्था नागरिकांची झाली आहे. एकतर ज्यांना लसिकरण केले त्यांचे लसिकरण अग्रक्रमाने पूर्ण करा. नविन लसिकरण थोडे पुढे ढकलले असते तरी चालेल. नाहीतरी निर्णय होई पर्यंत कालावधी पुढे सरकत चालला आहे. एकतर लसिंचा तुटवडा व नियोजन शुन्य लसिकरणाने सगळीच गोंधळाची स्थिती निर्माण झाली असल्याचे संबंधित शासनाचे अधिकारीही अनौपचारीक पणे बोलतात, आमच्या हातात काही नाही अस बोलल जात आहे. सुरुवातीला कोव्हिशिल्ड लस घेतल्या नंतर २८ दिवसाने दुसरा डोस घ्यावा असे सांगण्यात आले व काही लोकांनी त्याप्रमाणे लस घेतली सुध्दा.

नंतर २८ दिवसावरुन ४५ दिवसांनी लसीचा दुसरा डोस घेतला तरी चालतो अस सांगण्यात आले, त्याप्रमाणे सुरु झाल. मात्र कोव्हॅक्सिन लसीच तस नसुन २८ दिवसांनी किंवा ३६ दिवसांनी दुसरा डोस घ्यायचाच अस ठरलय. मग आता जर लसच मिळणार नसेल तर मग नविन नागरिकांना लसिकरणाची एवढी घाई का केली जाते ? लसिकरणाचा गोंधळ वाढला आहे. लोक जणु आता लस घेतली नाही तर भविष्यात परत लस मिळणारच नाही, अशी गर्दी करत आहेत. तालुक्यासाठी आलेली लस इतर शहरातील तालुक्यातील जिल्ह्यातील लोक खाजगी स्पेशल वाहन करुन वा रेल्वेने येथे माणगांवला येऊन लसिकरण करुन इथली लस संपवत आहेत. तसाच गोंधळ ऑनलाईन नोंदणीबाबत सुरु आहे गेले तिन दिवस माणगांवच्या नागरिकांना नोंदणीसाठी आपला पिनकोडच मिळत नाही. पहिल्या दिवशी ४०२१०४ नंतर ४०२१०१ नंतर ४०२११० व आज ४१०१०१ असा असल्याचे लोक बोलतात. या विषयी शासन अधिकारी का गप्प आहेत? या चुका त्रुटी दुरुस्ती करण्यासाठी कोणाकडे दाद मागावी ? अशी अवस्था कोरोना संकटाने पिडितांची झाली आहे. शासनाच्या मुख्याधिकारी, तहसिलदार, प्रांताधिकारी, जिल्हाधिकारी यांनी या विषयी लोकांना लसिकरणासाठी योग्यते मार्गदर्शन करुन संभ्रमावस्थतेतुन बाहेर काढण्यासाठी लक्ष घालावे तसेच जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे व खासदार सुनिल तटकरे यांच्याकडे नागरिकांची सविनय मागणी होत आहे.

# माथेरानमध्ये पशुचारा वाटप अनेक हात सरसावले

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान पर्यटन नगरी मध्ये वाहतुकीचे प्रमुख साधन म्हणून घोड्याचा उपयोग केला जातो व हाच घोडा त्या कुटुंबाचेही पोट भरण्याचे काम करीत असतो पण पर्यटन बंद झाल्याने घोडा व्यवसाय बंद पडला आहे त्याचा फटका ह्या मुक्या जनावरांना बसू नये ह्या करिता अनेक सेवाभावी संस्था पुढे येऊन मदतीचा हात पुढे करीत असून त्यात आज मुंबई येथील नेश फाउंडेशन, योडा फाउंडेशन व ऑल स्पेशीस अलायक संस्था ह्यांची भर पडली असून त्यांच्या मार्फत आज माथेरांमधील गरजू अश्वचालक, भटकी कुत्रे व येथील माकडा साठी खाद्य उपलब्द करण्यात आले

माथेरान मध्ये घोडेस्वारीसाठी अनेक जण येत असतात व त्यांचे माथेरांमधील अश्व चालकांवर अतोनात प्रेम आहे. त्यामुळेच ही मंडळी अशावेळी अश्व चालकांना सढळ हाताने मदत करीत असतात ह्याचा अनुभव मागील लॉक डाऊन मध्ये ही येथील स्थानिकांना आला आहे ह्यावर्षी ही रोजच नवनवीन एनजीओ माथेरानच्या अश्व चालकांच्या मदतीस समोर येत असल्याने अश्व चालकांचा चाऱ्याचा प्रश्न निदान दोन ते तीन महिन्यांसाठी सुटला आहे.

त्यातच आज मुंबई येथून श्री आदित्य ठाकरे व महापौर किशोरीताई पेडणेकर यांच्या समवेत काम करणाऱ्या नेश फाउंडेशन, योडा फाउंडेशन, सारख्या संस्थांनी येथील जनावरांसाठी मोफत चारा उपलब्द केला असून काही स्थानिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप ही सुरू केले आहे ह्यावेळी पूनम समतानी, विकी डिसिल्वा, पूजा सकपाळ व लायन मुरतुझा दिवाण ह्यांनी मोलाचे योगदान दिले असून लवकरच अजून गरजवंताना मदत देण्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी माथेरान नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत, नगरसेवक शकील पटेल, नरेश काळे, कुलदीप जाधव यांसह गावातील अन्य मान्यवर उपस्थित होते.

# प्लाझ्मा लॅबला परवानगी देण्याची शेकापची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मध्ये प्लाझ्मा लॅबला परवानगी द्यावी अशी मागणी शेकापचे राजेश केणी यांनी केली आहे. या संदर्भाचे पत्र त्यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे.

सध्या कोरोना महामारीने संपूर्ण देशात थैमान घातले आहे. रायगड जिल्ह्याचे प्रवेश व्दार असलेल्या पनवेल मध्येही त्यानें चांगलेच हातपाय पसरले आहे. कोरोना आजारावर सद्या प्लाझ्मा वरदान ठरत असून या प्लाझ्माची पनवेल मध्ये कमतरता भासत आहे. त्यातच पनवेल मध्ये प्लाझ्मा लॅब नसल्याने प्लाझ्मा दान करणाऱ्या दात्यांना प्लाझा देण्यासाठी मुंबई, नवी मुंबईत हेलपाटे मारावे लागत आहे.जर पनवेलच्या लॅब यांना प्लाझ्मा लॅब साठी परवानगी दिल्यास कोरोना रुग्णांना प्लाझ्मा उपलब्ध होवू शकेल असे राजेश केणी यांचे म्हटलं आहे. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात राजेश केली यांनी, पनवेल मधील लॅब यांना प्लाझ्मा लॅबची परवानगी दिल्यास त्याचा फायदा कोरोना रुग्णांना अधिक लाभदायक ठरणार असून पनवेल मध्ये कोरोना मुळे होणारे मृत्यूदर कमी होवू शकते असे म्हटले आहे.

# सुर्योदया फाउंडेशन मार्फत आरोग्य यंत्रणेला सहा ऑक्सिजन मशीन



**दै.रायगड नगरी । तळा**

सुप्रसिद्ध गायिका पद्मश्री डॉ.अनुराधा पौडवाल यांच्या सुर्योदया फाउंडेशन मार्फत व रायगड भूषण कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नाने रायगड जिल्ह्यातील पाच शासकीय रुग्णालय मध्ये ऑँक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन आरोग्य यंत्रणेला देऊन सामाजिक दायित्व निभावले. आपदग्रस्त काळात शासनाच्या मदतीला नेहमी सामाजिक बांधिलकी जपत हे संस्था मदतीचा हात पुढे करीत असते. मग शैक्षणिक, सामाजिक कार्यात सदैव पुढे असते.

निसर्ग चक्रीवादळात अनेक घरांची पडझड, शाळा कॉलेज, याचे छप्पर उडाले असतानाच मदतीचा हात पुढे केला तर कधी पाणी टंचाईग्रस्त गावाला पाण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. याचाच एकभाग म्हणून सद्यस्थितीत आपदग्रस्त कोरोना काळात रूग्ण संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत असून प्राणवायूची कमतरता पडत असल्याचे लक्षात घेऊन सुर्योदया फांऊंडेशनच्या सर्वेसर्वा डॉ. अनुराधा पौडवाल यांच्या हस्ते देण्यात आले. रायगड जिल्ह्यातील माणगांव शासकीय रुग्णालय कोविड सेंटर- २ ऑक्सिजन मशीन श्रीवर्धन शासकीय रुग्णालय कोविड-२ ऑक्सिजन मशीन लोणेरे शासकीय कोविड सेंन्टर - २ ऑक्सिजन मशीन तळा ग्रामीण रुग्णालय -१ ऑक्सिजन मशीन म्हसळा शासकीय ग्रामीण रुग्णालय -१ ऑक्सिजन मशीन जे जे रुग्णालय मुंबई -३ ऑक्सिजन मशीन अशी११ ऑँक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशीन डोनेट करण्यात आली. त्यावेळी रायगड भूषणतथा नाना पालकर स्मृती प्रतिष्ठानचे विश्वस्तकृष्णा महाडिक,जे जे रुग्णालयाचे अधीक्षक डॉ संजय सुरासे सर श्रीवर्धन शासकीय रुग्णालयाचे अधिक्षक डॉ मधुकर ढवळे, माणगाव शासकीय रुग्णालयाचे अधिकारी डॉ इंगोले , म्हसळा शासकीय रुग्णालयाचे डॉ. महेश मेहता बबन मनवे, तळा शासकीय रुग्णालयाचे वतीने सामाजिककार्यकर्ते महेन्द्र कजबजे नगरसेवक चंद्रकांत रोडे उपस्थित होते.

# पनवेल व रायगडमधील होमगार्डस मानधनाविनाच

**दै.रायगड नगरी । पनवेल**



लॉकडाऊनची अंमलबजावणी, सण, उत्सव, यात्रा जत्रांच्या बंदोबस्तासाठी पोलिसांच्या बरोबरीने राबणारे म्हणून होमगार्डकडे पहिले जाते. त्यांनी मागील वर्षांपासून पोलीस दलाला मोठी साथ केली आहे. यावेळीही ते लॉकडाउन अंमलबजावणीच्या उपाययोजनात आघाडीवर आहेत. मात्र या होमगार्ड चार-पाच महिन्यांपासून रायगड जिल्ह्यातील सुमारे १०० ते २० शासनाकडून मानधनच मिळालेले नाही. त्यामुळे त्यांना ड्युटीवर जाण्यासाठी दुचाकीच्या पेट्रोलसाठीही उसनवारी करायची वेळ आली आहे. पनवेल परिमंडळ २ मध्ये ४० होमगार्ड चोखपणे कार्य बजावीत आहेत.

लोकसंख्येच्या तुलनेत पोलिसांची संख्या कमी आहे. त्यामुळे त्यांच्यावर कामाचा मोठा ताण आहे. सातत्याने बंदोबस्तासह विविध प्रकारची कामे त्यांना करावी लागतात. त्यासाठी होमगार्डना त्यांच्या कामावर आधारित मानधन दिले जाते. मागील वर्षापासून पोलिसांना कोरोनाच्या लॉकडाउनच्या अंमलबजावणीत होमगार्डची मोठी मदत झाली आहे. यंदाही कोरोनाच्या संसर्ग वाढल्याने कडक लॉकडाउन करण्यात आला आहे. त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांना होमगार्ड मदत करीत आहेत. पोलिसांच्या बरोबरीने तेही रात्र दिवस रस्त्यावर उभे राहत आहेत. त्यामुळे पोलिसांचा टॅन काहीसा हलका झाला आहे. रायगडमध्ये सुमारे १०० ते २०० होमगार्ड कार्यरत असल्याची माहिती मिळत आहे. त्याबरोबर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ २ विभागामध्ये ४० होमगार्ड पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. मात्र त्यांना डिसेंबर २०२० पासून मानधनच मिळालेले नाही होमगार्डपैकी बहुतांशजण हे आर्थिक स्थिती बेताची असलेल्या कुटुंबातील आहेत. त्यांना महिन्याच्या मानधनावर कुटुंब चालव-वे लागत आहे. मात्र पाच मेहुण्यांपासून, तर काहींचे चार महिन्यापासून मानधन मिळालेले नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे कुटुंबांचा चरितार्थ कसा चालवायचा हा प्रश उभा आहे. शासनाने तातडीने त्यांना मानधन देण्याची गरज आहे.

# विकेंड लॉकडाऊन नंतर बाजारपेठेत गर्दी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन शासनाने राज्यात व जिल्ह्यात करण्यात आलेल्या दोन दिवसांच्या विकेंड लॉकडाऊन नंतर आज सोमवारी सकाळी बोर्ली-मांडला नांदगाव मजगांव परीसरात जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी परीसरातील नागरिकांची गर्दी दिसून आली.

राज्यात व जिल्ह्यात जागतिक महामारीच्या पार्श्र्वभूमीवर कोरोना साखळी तोडण्यासाठी शासनाने निर्बंध लागू करण्यात आले असून जमावबंदी व संचारबंदी लागू करण्यात आली आहे तसेच पंधरा मे पर्यंत लॉकडाऊन करण्यात आला असून विकेंड लॉकडाऊन आधी व नंतर बाजारपेठेत जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी परीसरातील नागरिकांची लगबग दिसून येत आहे. पाचव्या विकेंड लॉकडाऊन नंतर आज सोमवारी सकाळी मुरुडसह बोर्ली-मांडला नांदगाव मजगांव परीसरात जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी गर्दी दिसून आली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे. सदर मिळकतीचे मालक श्री.सागर अभिमन्यू जाधव यांचेकडून आमचे अशिलांनी कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आाहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : हरिग्राम, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | भोगवटादार |
|---|---|---|---|---|---|
| हरिग्राम | ७४ | २ | ०-०३-५०<br>पो.ख.०-०१-८० | ०.२५ | श्री.सागर अभिमन्यू जाधव |

सदरची मिळकत ही श्री.सागर अभिमन्यू जाधव यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा व हस्तांतरीत करण्याचा त्यांस पूर्ण हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर असूनही तो त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

पनवेल
दि.१०/०५/२०२१

**सही/-**
**ॲड.श्री.जगदीश बी.ठाकूर**
**फ्लॅट नं.१०२, तळमजला, बी विंग,**
**स्वरांजली को.ऑप.हौ.सो. रुपाली सिनेमा**
**जवळ पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८२०१९५२१९/९९२०२४१४५४**



सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा/वाटपपत्र/हक्कसोड** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | तळोजा-६+७०६ | पेंधर-२२२ | १२५/१B<br>१२५/२<br>१६२/१<br>१६१/२<br>१५८/३A<br>१५८/१ | ०-४३-३<br>१-४६-६<br>०-४१-५<br>०-१६-०<br>१-४७-०<br>१-८२-१ | ५०५० चौ.मी. पैकी ८०० चौ.मी. | भूखंड क्र. ३, सेक्टर -२३, क्षेत्र ७९६.२२ चौ.मी. | **१) अब्दूल कादीर एम.हुसेन पटेल**<br>**२) कै. अब्दूल हमीद महमद हुसेन पटेल (मयत) व कै. आयेशा अब्दुल हमीद पटेल (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. महमद अनवर अब्दुल हमीद पटेल,<br>२) श्री. अब्दुल करीम अब्दुल हमीद पटेल,<br>३) श्री. अब्दुल लतीफ अब्दुल हमीद पटेल,<br>४) श्री. अब्दुल रऊफ अब्दुल हमीद पटेल,<br>५) श्री. इरफान अब्दुल हमीद पटेल,<br>६) श्री. असीफ अब्दुल हमीद पटेल,<br>७) श्री. महंमद साजीद अब्दुल हमीद पटेल,<br>८) हासिना यासिन पटेल,<br>९) शहनाज महंमद सादिक पटेल,<br>१०) नुरुन्नीसा जाकीर हुसेन पटेल हे द्वितीय असून हक्कसोडपत्र लिहून देणारे आहेत | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-३, दस्त क्र. ११११६/२०२०, हे हक्कसोडपत्र प्रमाणे **श्री. अब्दुल रेहमान अब्दुल हमीद पटेल** यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/०५६/२०२१-२२

# संक्षिप्त...

## म्हसळा तालुक्यातील मौजे घोणसे येथील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

म्हसळा तालुक्यातील घोणसे येथील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती.

याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मौजे घोणसे, ता.म्हसळा येथील स.नं.६०, क्षेत्र ०.९१.० हे.आर. पैकी ०.०५.० हे.आर. या सरकारी गोठण, ग्रामपंचायत देवघर यांच्याकडे निहीत असलेल्या शासकीय मिळकत या मिळकतीमधील ०–०५–० हे.आर.ही जमीन ग्रामपंचायतीकडून शासनाकडे पूर्नग्रहण करण्यात आली असून ही जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र घोणसे, ता.म्हसळा करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## सुधागड तालुक्यात ८ कोरोना बाधितांची नोंद

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात रविवारी (ता.९) कोरोनाचे ८ रुग्ण सापडले आहेत. तर ८ जण बरे झाले आहेत. सध्या तालुक्यात कोरोनाचे १५८ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ९४० रुग्ण झाले असून ७४२ रुग्ण बरे झाले आहेत. आणि ४० रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे.

## तळा तालुक्यातील मौजे गिरणे येथील नवीन आरोग्य उपकेंद्रासाठी जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तळा तालुक्यातील मौजे गिरणे येथील नवीन आरोग्य उपकेंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे गिरणे ता.तळा येथील गट नं.११६ एकूण क्षेत्र ०.०८.०० हे.आर. पैकी ०.०५.०० हे.आर. जमीन महसूल मुक्त व सारामाफीने जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन आरोग्य उपकेंद्र गिरणे, ता.तळा करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

तळा तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब जिल्ह्याच्या दृष्टीने महत्वाची आहे.

# पोलादपूर नगरपंचायत हद्दीतील विकासकामांना गती ; लोकप्रतिनिधी नसताना प्रशासनाचा कारभार सुरळीत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरातील नगरपंचायतीची पाच वर्षांची मुदत संपुष्टात आल्यानंतर प्रशासनाने निवडणुकीपर्यंत जाताना सत्ताधाऱ्यांनी सुचविलेल्या विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न चालविला असून कोणत्याही प्रकारची दर्जा व गुणवत्ता नियंत्रणाची सुविधा नसताना अन् नियोजनाचा अभाव दिसत असताना प्रशासनाचा कारभार सुरळीतपणे चालला आहे.

पोलादपूर शहरात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ला चरई फाट्यावरून जुना महाबळेश्वर रस्त्याच्या सुरूवातीस गेल्या काही दिवसांपासून डांबरीकरण केलेला ओबडधोबड रस्ता अस्तित्त्वात आला आहे. यानंतर जुन्या पोस्ट ऑफिससमोर रस्ता दिसून येत नसताना जुनी बाजारपेठ ते गांधी चौक पूर्णपणे वगळून शिवाजीनगर गाडीतळ भागात जेथे हा रस्ता पोलादपूर महाबळेश्वर वाई सुरूर रस्त्याला जोडला जातो तिथे खडीकरण व डांबरीकरणासाठीची रसद जमवाजमव झाल्याचे दिसून येत आहे. चौपदरीकरणात नगरपंचायतीला जराही विचारात घेतले नसताना काही विकासकामे करताना गोकूळनगर,सैनिकनगर रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील पाच पैकी तीन बाबींकडे दूर्लक्ष केल्याने निकृष्ट दर्जाचे होत असल्याकडे प्रशासकांचे दूर्लक्ष झाले आहे. मेड इन युएसए पध्दतीचे मात्र, युएसए म्हणजे अमेरिका धर्तीचे नव्हे तर चक्क उल्हासनगर प्रकारचे डांबरीकरणाचे रस्ते साकारण्याचा प्रकार अंदाजपत्रकातील पाच पैकी तीन बाबींकडे दूर्लक्ष करून सीलकोट पडल्यामुळे सध्या सीलकोटखाली झाकला गेला आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर महाबळेश्वर मार्ग सुरू होतो तिथे एक डांबरी गतिरोधक जसा सार्वजनिक बांधकाम विभागाला अंधारात ठेऊन अस्तित्वात आला आहे तशाच प्रकारे नगरपंचायतीला अंधारात ठेऊन भैरवनाथनगर सहाणेकडे जाणाऱ्या



रस्त्यावरही एक गतिरोधक अस्तित्वात आला आहे. यामुळे पोलादपूर नगरपंचायतीचे प्रशासन विनाखर्च विकासकामे करण्याकडे ज्यातऱ्हेने तत्परता दाखवित आहे, हे पाहता नजिकच्या काळात ऑनलाईन निविदा प्रसिध्द करताना ठेकेदारांनी स्वखर्चाने पुर्वीच केलेल्या विकासकामांचा समावेश या निविदांमध्ये समावेश केला जाण्याची शक्यता आहे.

यामुळे पारदर्शकतेला हरताळ फासताना ऑनलाईन निविदांचे नियम पाळून काही निविदांमध्ये आधीच झालेल्या कामांचा समावेश करून प्रशासनाकडून विकासकामांच्या सहृदय भावनेचे उदात्तीकरण घडण्याची शक्यता दिसून येणार आहे. यामुळे नगरपंचायतीच्या सत्ताधाऱ्यांकडून शेवटच्या वर्षांत झालेल्या सत्ता सुंदोपसुंदीचा विसर पडून प्रशासनाकडून सत्ताधाऱ्यांचा पुन्हा सत्तेत येण्याचा मार्ग मोकळा होण्यासाठी विकासकामांची पुर्तता करण्याचा कल दिसून येत आहे.

मात्र, आगामी निवडणूकीपुर्वी कोणताही सत्ताधारी सद्यस्थितीत नगरसेवक अथवा नगराध्यक्ष सत्तेत नसताना प्रशासक असलेल्या प्रांताधिकारी तथा उपविभागीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींचे आदेश पाळून काही विकासकामे सुरू ठेवली आहेत. यामुळे संबंधित नगरपंचायत यंत्रणेकडे अभियंता अथवा दर्जा आणि गुणवत्ता नियंत्रण ठेवणारी जबाबदार व्यक्ती अथवा अधिकारी कंत्राटीपध्दतीने सेवेत होती तसेच सदर व्यक्तीचा कालावधी संपुष्टात आल्याने याकामी दूर्लक्ष होणार हे गृहित धरलेले नाही, परिणामी, ठेकेदाराची मनमानी आणि राजकीय वर्चस्व ठेवणाऱ्या व्यक्तींनी मुकादमाची भूमिका घेतल्यामुळे कामाचा दर्जा निकृष्ट ठेऊन आगामी निवडणुकांची बेगमी करून घेण्याचा कल निर्माण झाल्याकडे प्रशासकांचे दूर्लक्ष होत आहे अथवा प्रशासकांचे अपेक्षित यश आहे, हे यातून स्पष्ट झाले नाही.

पोलादपूर नगरपंचायतीकडून होणाऱ्या विकासकामांचे सोशल ऑडीट होण्याची गरज निर्माण झाली असून प्रशासकांनी सत्ताधाऱ्यांना सोयीची कामे करताना दर्जा व गुणवत्ता नियंत्रणाकडे दूर्लक्ष केल्याने ठेकदारांमार्फत झालेल्या हयगयीविरूध्द जर कोरोना लॉकडाऊन काळात राज्य सरकारकडे दाद मागता येणार नसल्यास संबधित विकासकामांची देयके अदा करण्याची घाई प्रशासनाने करू नये, अशी पोलादपूरकरांची अपेक्षा आहे. पोलादपूर जनतेला गृहित धरून प्रशासनाआडून सत्ता पुन्हा काबिज करण्यासाठीची बेगमी झाल्यास निवडणुकीच्या मतदानातून जनतेकडून सोशल ऑडीट होऊ नये, यासाठी जनतेलाही या आमिषं देण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा असून या सर्व प्रकारात साथ देणारे प्रशासनातील अधिकारी लवकरच बदली होऊन अन्यत्र जाण्याची भाषा करू लागल्याने ते मिठाईच्या पेटाऱ्यांमध्ये बसून स्वत:ची सुटका करण्यात यशस्वी ठरतील, अशी शक्यता निर्माण झाली आहे.

# बोर्लीपंचतनमध्ये कडक लॉकडाऊन लावण्याच्या हालचाली



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यात सध्या ८६ कोरोनाग्रस्थ उपचार घेत असून बोर्लीपंचतन परिसरात रुग्णांची वाढती संख्या असताना बाजारपेठेत खरेदीसाठी मोठ्या संख्येने गर्दी वाढू लागली आहे. त्यामुळे कोरोना व्हायरस चा संभाव्य वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाच्या सूचनेनुसार व्यापारी व प्रशासनाची रविवारी संयुक्त बैठक घेण्यात आली.

या बैठकीत आठवड्याभरात कडक लॉकडाऊन लावण्याचे संकेत देण्यात आले. मात्र, या सभेत ही प्रशासनाकडून ठोस निर्णय घेण्यात आला नसल्याने सद्या सरकारने घोषित केलेल्या लॉकडाऊन सुरूच राहणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

बोर्लीपंचतनमधील कोरोना संसर्ग रोखण्यासाठी प्रशासन सज्ज होत आहे. शहराच्या बाजारपेठेतील गर्दी टाळण्यासाठी अनेक घटकांशी प्रशासनाकडून गेल्या २७ एप्रिलमध्ये पहिली सभा घेण्यात आली होती. तर आठवड्यानंतर कडक लॉकडाऊन करत बोर्लीपंचतन बाजारपेठेतील गर्दी कमी करता येईल यासाठी रविवारी ता. ९ रोजी महसूल विभाग, आरोग्य अधिकारी, पोलीस, व्यापारी व स्थानिक प्रशासन यांची दुसरी संयुक्त बैठक डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये सोशल डिस्टंन्सिंग ठेवत सायंकाळी घेण्यात आली.

कोरोनात नियमांचे पालन होत नसल्याने अनेक ठिकाणी गर्दी होत आहे. दुसऱ्या लाटेतील कोरोना विषाणू चा संसर्ग टाळण्यासाठी संपुर्ण राज्यात लॉकडाऊन चे आदेश देण्यात आले आहेत. सद्या संचारबंदी सोबत अत्यावश्यक सेवेमध्ये देखील वेळेचे बंधन ठेवून नियमावली जाहीर करण्यात आली. मात्र, विविध ठिकाणी जनतेकडून नियमाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या लॉकडाऊनमधील मुभा दिलेल्या सात ते अकरा या वेळेनंतर ही विनाकारण फिरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. खबरदारी घेणे हाच एकमेव उपाय असल्याचे प्रशासन मोठ्या पोटतिडकीने सांगत असताना, नागरिकांमधून सहकार्य मिळत नसल्याने प्रशासन देखील जनतेपुढे हतबल होत आहे. यासाठी पुढील आठवड्यात बोर्ली शहरात कडक लॉकडाऊन लावण्याच्या हालचाली प्रशासकडून सुरू आहेत.

# खरेदीसाठी पाली बाजारपेठेत नागरिकांची मोठी गर्दी



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

विकेंड लॉकडाऊनचे पालन केल्यानंतर सोमवारी (ता.१०) सकाळपासूनच पाली बाजारपेठेत व इतरत्र खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी केली होती. परिणामी पालीमध्ये लॉकडाऊन व संचारबंदीचा लोकांना विसर पडलेला दिसला. नियमांचे देखील पालन होतांना दिसले नाही.

राज्य शासनाकडून कडक लॉकडाऊन लागू करण्यात आला आहे. तरीही अत्यावश्यक कामांशिवाय नागरिक मोठ्या संख्येने बाजारात खरेदीसाठी बाहेर पडत आहेत. पाली बाजारपेठेत सकाळपासून सर्व प्रकारची दुकाने काही प्रमाणात खुली होती. सोशल डिस्टनसिंगचा लोकांना विसर पडलेला दिसत आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे असे सामाजिक कार्यकर्ते परेश शिंदे यांनी सांगितले. विनाकारण फिरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल असे तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी याबाबत सांगितले.

# माथेरान बंगले धारकांनी दिला स्वच्छतेचा संदेश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानला वर्षातून एकदा फिरावयास येणारे येथील काही बंगले धारक हे केवळ विश्रांती साठी येत नसून यातील काही निसर्गप्रेमी हे नेहमीच इथल्या पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुरेपूर प्रयत्न करताना दिसतात.



दोन दिवसांपूर्वी येथील गारबट बंगला हा सुप्रसिद्ध अभिनेत्या स्मिता जयकर यांच्या मालकीचा असून त्यांचे नातेवाईक तसेच मुलगा आर्शिद जयकर आणि भाऊ भिवलकर यांनी चक्क हातात प्लास्टिक पिशव्या घेऊन रस्त्याच्या दुतर्फा नजरेस पडणाऱ्या प्लास्टिकच्या पाण्याच्या रिकाम्या बाटल्या भरून गोळा केल्या आणि त्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्यासाठी आपल्यासोबत नेल्या. याबाबत त्यांना विचारले असता ते म्हणाले की आम्ही दरवर्षी न चुकता इथे आवर्जून भेट देत असतो. आमचे या निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या माथेरान वर निस्सीम प्रेम असून इथल्या हवेतील स्वच्छ ऑक्सिजन आम्हाला नेहमीच आकर्षित करीत असतो.त्याचप्रमाणे इथल्या नगरपरिषदेच्या सभागृहातील सदस्य ज्याप्रमाणे कामात झोकून देत आहेत आणि इथली वनराई अबाधीत ठेवण्यासाठी कष्ट घेत आहेत ही बाब खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. आम्ही एक सामाजिक बांधिलकी म्हणून स्वेच्छेने स्वच्छता मोहीम राबविण्यात धन्यता मानतो.

माथेरान करांनी सुध्दा आपल्या प्रभागातील तसेच आजूबाजूला अस्तव्यस्त पडणारा ओला सुका कचरा नगरपरिषदेच्या व्यवस्थापन करणाऱ्या कर्मचारी वर्गाकडे देऊन नगरपरिषदेला सहकार्य करावे जेणेकरून इथे अधिकाधिक पर्यटकांची संख्या वाढुन सर्वांना उत्तम प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. आम्हाला वेळोवेळी माथेरान नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत हे सहकार्य करत असतात.त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छता ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आणि सामाजिक बांधिलकी म्हणून मेहनत घेतल्यास सर्वाच्या आरोग्यासाठी लाभदायक ठरणार आहे. असेही आर्शिद जयकर आणि भवलकर यांनी सांगितले.

# वडखळ सरपंचाविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील वडखळ ग्रामपंचायतीचे सरपंच राजेश मोकल यांच्याविरुद्ध ग्रामपंचायतीच्या काही विद्यमान सदस्यांनी अविश्वासाचा ठराव दाखल केला होता. त्या ठरावाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वडखळ ग्रामपंचायतीच्या सर्व विद्यमान सदस्यांची विशेष सभा पिठासन अधिकारी पेण तहसिलदार डॉ. अरुणा जाधव याचे अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालय वडखळ येथे आयोजित केली होती. या सभेत अविश्र्वास ठराव मंजुर झाला.

या ग्रामपंचायतीमध्ये एकूण सरपंच वगळता १५ सदस्य असून, त्यातील काही सदस्यांनी अविश्वासाच्या ठरावाचा प्रस्ताव दाखल केला होता. यामध्ये ग्रामपंचायत सदस्यांना विश्वा सात न घेणे, विकासकामे वेळेवर न करणे व दुर्लक्ष करणे, सरपंच यांचा मनमानी कारभार, असे मुद्दे मांडण्यात आले होते



पिठासन अधिकारी डॉ. अरुणा जाधव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत सरपंचाचे विरोधात दाखल केलेल्या अविश्वास ठरावाचे बाजुने १३ सदस्यानी मतदान केल्याने हा अविश्वास ठराव मंजुर झाला.

### अविश्वास ठरावाचे विरोधात अपिल करणारः राजेश मोकल

ग्रामपंचायतीचे काही सदस्य बेकायदेशिर काम करण्यास सांगत होते. बेकायदेशिर घरपट्टी लावण्यास सांगत होते. ही कामे करण्यास नकार दिल्याच्या आकसापोटी हा अविश्वास ठराव दाखल करण्यात आला तर १५ व्या वित्त आयोगातील विकास आराखड्याला शासनाने मंजुरी न दिल्याने विकास कामे आडकली. तर जेएसडब्लु कंपनीच्या सीएसआर फंडातुन विकास कामे चालु आहेत तर जिल्हा नियोजन मंडळातुन विकास कामे सुरु आहेत. आमदार निधीतुन दोन व्यायाम शाळा, अस्थी विसर्जन घाट आदि विकास कामे करण्यात आली आहेत कोणत्याही प्रकारे मनमानी कारभार केलेला नाही सदस्यांना विश्वासात घेवुन कामे केली आहेत.तर या अविश्वास ठरावाचे वेळी गुप्त मतदानाची मागणी पिठासन अधिकाऱ्यांनी मान्य केली नाही. हा अविश्वास ठरावच बेकायदेशिर असल्याने या अविश्वास ठरावाचे विरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे अपिल करणार असल्याचे सरपंच राजेश मोकल यांनी सांगितले.

# गावठी कट्ट्याने गोळी झाडून हत्येचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सावळे भागात एका व्यक्तीवर गावठी कट्ट्याच्या सहाय्याने गोळी झाडून हत्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या गोळीबारात संबंधित व्यक्ती गंभीर जखमी झाली असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस हल्लेखोराचा शोध घेत आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जनार्दन सदाशिव धुळे असे जखमी व्यक्तीचे नाव आहे. ते सावळे हेदवली येथे राहणारे असल्याचे समजते. जनार्दन धुळे हे ९ मे रोजी ११ वाजण्याच्या सुमारास सावळे येथील जुन्या कोटींबे रोडवर गावाबाहेर असलेल्या मंदिरात दर्शनासाठी गेले होते. हा परिसर कोटींबे आणि सावळा गावाच्या मध्यभागी येत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात घनदाट जंगल आहे. मंदिरातून घरी परतत असताना धुळे यांच्यावर कोणीतरी पाठीमागून गावठी कट्ट्याच्या सहाय्याने गोळी झाडली. या गोळी धुळे यांच्या पाठीमागील बाजूस कंबरेजवळ लागल्याने ते जखमी झाले. जखमी अवस्थेत स्वतः धुळे यांनी या घटनेची गावात फोनद्वारे माहिती दिली. त्यानंतर त्यांना सुरुवातीला कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र जखम गंभीर असल्याने त्यांना अधिक उपचारासाठी पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत अनिल घेरडीकर, कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक भोर हे घटनास्थळी हजर झाले. यासह रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे हेदेखील घटनास्थळी दाखल झाले होते. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक अशोक भोर करीत आहेत.

# रोहा शहर बाजार कडकडीत बंद ; कोलाड नाक्यावर अफाट गर्दी, कोण नियंत्रण ठेवणार?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना महामारीच्या काळात अनेक संकट तरी देखील नागरिकांना स्वतःच्या जीवाची पर्वा नसल्याचे दिसून येत असल्याचे सर्वत्रच चित्र पहावयास मिळत आहे. कोरोनाचा पादुर्भाव रोखण्यासाठी अनेक नागरिकांसाठी देशात व राज्यात तसेच जिल्हास्तरावर अनेक उपाय योजना केल्या जात आहेत त्याला नागरिकांकडून केराची टोपली दाखवत असल्याचे चित्र कोलाड नाक्यारील गर्दीमुळे पहावयास मिळत आहे.

देशात व राज्यात पुन्हा दुऱ्यांदा उद्धभवलेल्या कोरोना लाटेचा पादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात विकेंड लॉकडाऊन जाहीर केले आहे त्यातच गर्दी टाळण्याचे आव्हान देखील केले आहे सध्या जिल्ह्यात कोरोना संसर्गाची रुग्ण संख्येत होत असलेली प्रचंड वाढ त्यातच मृत्यू दर वाढलाअसल्याचे लक्ष्यात घेत मागील ८ एप्रिल पासून पुढे पाच दिवस रोहा शहर बाजार पूर्ण बंद ठेवण्यात आल्याने आता थेट मुंबई गोवा महामार्गावरील आंबेवाडी कोलाड नाक्यावर नागरिकांची आफाड गर्दी होत असल्याचे प्रशासकीय यंत्रणेच्या नियमावलीचे तीन तेरा वाजवत प्रचंड वहानांसह नागरिकांची गर्दी पहावयास मिळत असून मोठा धोका उद्धभवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



रोहा तालुक्यातील कोरोना संसर्गाचा पादुर्भाव रोखण्यासाठी रोहा शहर बाजारातील सर्व दुकाने बंद ठेवण्याची अमलबजावणी रोहा नगरपालिका व प्रशासकीय यंत्रणेने घेतली मात्र आता काही नागरिक थेट कोलाड गाठत असून या ठिकाणी गर्दी होऊ लागत असल्याने या गर्दीवर नियंत्रण कोणाचे असा प्रश्न डोळ्यासमोर उभा राहिला आहे.

शासनाच्या नियमाप्रमाणे सकाळी ७ ते ११या वेळेतच आत्यावशक दुकाने खुली असतात त्यात तोंडावर मास्क नसलेल्या नागरिकांवर दंडात्मक कारवाही केली जाते मात्र विकेंड लॉकडाऊन मध्ये आंबेवाडी कोलाड नाका कडकडीत बंद आहे असे अनेकदा निदर्शनास येत असून देखील या ठिकाणी होत असलेल्या आफाड गर्दीमुले कोरोना संसर्गाचा धोका उद्धभवण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे सर्वत्र बोलले जात आहे.